संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांचे कार्यालय
मु.पो.ता.वैराट रोड, चिखलदरा ता.चिखलदरा जि.अमरावती पिन-444 807
ई-मेल-principal.mfrc933@gmail.com फोन नं.07220-230230

जा.क्रमांक:कक्ष:-03/सं.व.प्र.सं.चि./शिलि/ 195 /2026-27 चिखलदरा 444 807, दिनांक:- 10/08/2026

प्रति,

मा. उप वनसंरक्षक,
( शिक्षण व प्रशिक्षण )
म.रा.पुणे.

**विषय**:- माहे जुलै 2026 ची वन शैक्षणिक वार्ता सादर करणे बाबत.

**संदर्भ**:- आपले कार्यालयीन पत्र क्रमांक : कक्ष-1/प्रशिक्षण/187/2025-26 दिनांक 25/06/2025.

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथील नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी तुकडी क्रमांक 64 मधील प्रशिक्षणार्थींचे कार्यक्रम संबंधाने सुरु असलेल्या विविध प्रशिक्षण कार्यक्रमाचा दिनांक **01/07/2026** ते **31/07/2026** पर्यंतचा मासिक शैक्षणिक अहवाल सोबत सहपत्रित करुन अवलोकनार्थ व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सविनय सादर.

**सहपत्र**:- वरील प्रमाणे. ( पेज क्र. 01 ते 17 )

( कु. मुक्ताबाई वि. टेकाळे )
संचालक,
वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा.

Scanned with OKEN Scanner

# * प्रस्तावना *

वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा ही महाराष्ट्र राज्यातील वन विभागाच्या प्रशिक्षण क्षेत्रातील एक **अग्रगण्य व मान्यताप्राप्त** संस्था आहे. संस्थेमार्फत नवनियुक्त व कार्यरत वन कर्मचाऱ्यांना **गुणवत्तापूर्ण** आणि **शिस्तबध्द** प्रशिक्षण प्रदान करण्याचे कार्य सातत्याने करण्यात येते.

**दिनांक** 25/05/2026 पासुन संस्थेमध्ये नवनियुक्त अप्रशिक्षित **वनरक्षक** प्रशिक्षणार्थी **तुकडी क्र**. 64 यांचे सहा महिन्याचे **निवासी प्रशिक्षण** सुरु करण्यात आले आहे.

**दिनांक** 01/07/2026 **ते** 31/07/2026 या कालावधीत, संस्थेच्या **संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** यांच्या सक्षम नेतृत्व व मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणार्थीसाठी विविध शैक्षणिक, प्रात्यक्षिक, कौशल्यविकास व वनसंवर्धनास पूरक उपक्रम राबविण्यात आले. प्रशिक्षणाच्या गुणवत्तेस चालना देणारे आणि प्रशिक्षणार्थींचा सर्वांगीण विकासास हातभार लावणारे हे उपक्रम नियोजित व शिस्तबध्द पध्दतीने पार पडले.

सदर मासिक शैक्षणिक अहवालामध्ये दिनांक **01/07/2026 ते 31/07/2026** या कालावधीत राबविण्यात आलेल्या प्रशिक्षण उपक्रमांचा संक्षिप्त आढावा देण्यात आलेला आहे.

या अहवालाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे प्रशिक्षण कार्यक्रमातील विविध शैक्षणिक व प्रात्यक्षिक घटकांची स्पष्ट, शिस्तबध्द आणि कालानुक्रमिक नोंद सादर करणे. या माध्यमातून संस्थेतील प्रशिक्षणाची कार्यपध्दती, प्रशिक्षणार्थींची प्रगती, सत्रांची परिणामकारकता, तसेच एकंदर शैक्षणिक वातावरण यांचा समावेश असलेली संपूर्ण माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवणे अपेक्षित आहे.

हा अहवाल पुढील प्रशिक्षण सत्रांच्या नियोजनासाठी मार्गदर्शक ठरणारा असून, प्रशिक्षणाच्या गुणवत्ता नियंत्रणात तसेच धोरणात्मक निर्णय प्रक्रियेस सहाय्यक ठरेल. संस्थेमध्ये सुरु असलेल्या प्रशिक्षण उपक्रमांची पारदर्शक, संक्षिप्त व विश्लेषणात्मक माहिती या अहवालाच्या माध्यमातून प्रस्तुत करण्यात आलेली आहे.

# * अनुक्रमणिका *


| अ.क्र. | कार्यक्रमाचे नाव | पेज नं. |
|---|---|---|
| 01 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 64 यांचा प्रथम सत्र अभ्यासक्रम. (माहे जुलै 2026) | 03 ते 06 |
| 02 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 64 यांचा संस्थेमध्ये क्षेत्रीय अभ्यास दौरा. ( माहे जुलै 2026 ) | 07 ते 08 |
| 03 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 64 यांना GPS व GIS या विषयावर प्रशिक्षण. (दि. 10/07/2026 प्रशिक्षणाव्यतीरीक्त ) | 09 |
| 04 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 64 यांची प्रथम सत्र लेखी परीक्षा. (दि. 27/07/2026 ते 05/08/2026 ) | 10 |
| 05 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 64 यांचा कवायत व खेळ. ( माहे जुलै 2026) | 11 ते 12 |
| 06 | वन महोत्सव कार्यक्रम ( दि. 01 जुलै ते 07 जुलै 2026 ) | 13 |
| 07 | वसंतराव नाईक यांची जयंती. (दि. 01/07/2026) | 14 |
| 08 | श्री संत गुलाबराव महाराज यांची जयंती. (दि. 06/07/2026) | 15 |
| 09 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 64 यांची रात्रगस्त ( माहे जुलै -2026 ) | 16 |
| 10 | वृत्तपत्र कात्रणे. | 17 |

## 01. नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 64 प्रथम सत्र अभ्यासक्रम. ( माहे जुलै 2026 )







**वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 64 प्रथम सत्र अभ्यासक्रम. ( माहे जुलै 2026 )**

वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे **दि.** 25/05/2026 पासुन नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी **सत्र क्र.** 64 यांच्या **सहा महिने** कालावधी प्रशिक्षणाला सुरुवात झाली असुन सदर प्रशिक्षणार्थींचा प्रथम सत्र अभ्यासक्रम खाली दिलेल्या तक्ता प्रमाणे सुरु करण्यात आले.

| **अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षण सत्र क्र. 64 (कालावधी दि. 25/05/2026 ते 20/11/2026)** | | | |
|---|---|---|---|
| **अ. क्र** | **विषय** | **व्याख्याते** | **विषयनिहाय माहिती** |
| 01 | **कवायत व खेळ** | श्री. एस.एस. आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा.<br>श्री. महादेव धुर्वे ( कत्रांटी क.शि. व.प्र.सं.चिखलदरा ) | **कवायत व खेळ (**Drill and Sports)<br>प्रशिक्षणार्थ्यांना शारीरिक क्षमतेसाठी दैनिक कवायत व विविध खेळांचे प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये पथसंचलन, व्यायाम, लष्करी शिस्त, तसेच फुटबॉल, व्हॉलीबॉल इत्यादी खेळांचा समावेश होता.<br>**उद्देश:**<br>शारीरिक तंदुरुस्ती, टीमवर्क, व शिस्त यांचे महत्त्व पटवून देणे. |
| 02 | **वनस्पतीशास्त्र** | डॉ. कोकाटे मॅडम, सिपना कॉलेज, चिखलदरा. | **उद्देश:** वनस्पतींच्या रचनेचा, वाढीचा, वर्गीकरणाचा आणि त्यांच्या पर्यावरणाशी असलेल्या संबंधांचा अभ्यास करणे.<br>**मुख्य घटक:**<br>वनस्पतींची रचना (मूळ, खोड, पाने, फुले, बीज).<br>प्रकाशसंश्लेषण, श्वसन, पोषण प्रक्रिया.<br>वनस्पतींचे वर्गीकरण , वृक्ष, झुडपे, गवत इ.<br>वृक्षांची ओळख (Tree Identification) आणि स्थानिक जातींचे महत्व.<br>बीज संकलन, अंकुरण, रोपवाटिका व्यवस्थापन. |
| 03 | **वनसंवर्धन शास्त्र (भाग-01)** | श्री. एस.बी. धर्माधिकारी, सहा. वनसंरक्षक (से.नि.) | **उद्देश:** वन वृक्षांचे संवर्धन, वाढ, आणि पुनरुत्पादन यांचा अभ्यास.<br>**मुख्य घटक:**<br>वन संवर्धन परिचय, वृक्षांची वृध्दी, वनांच्या वाढीवर परिणाम करणारे घटक, वनस्पतींचे अनुक्रमण, राज्यातील महत्वाचे वनांचे प्रकार, वृक्षांचे वर्गीकरण, जोपासना, विरळणी. |
| 04 | **वृक्षांचे वनसंवर्धन व त्याचे समुपयोजन (भाग-02)** | श्री. आर.बी.गिरी, वनपरिक्षेत्र अधिकारी (से.नि.) रा. परतवाडा. | **उद्देश:** आर्थिक मूल्याच्या प्रजातींचे उत्पादन वाढवणे, प्रति युनिट वन उत्पादन वाढवणे, दर्जेदार लाकडाचे उत्पादन घेणे, दोन कापणीचे चक्रातील वर्षे कमी करणे, रिकाम्या भागात मानवनिर्मित जंगलांची निर्मीती करणे, मानवनिर्मित रोपवनांची निर्मिती करणे, विदेशी प्रजातीची वनामध्ये लागवड करणे.<br>**मुख्य घटक:**<br>सिल्विकल्चर वर्ण / गुणधर्म, निवडक वन वृक्ष प्रजातींचे वनसंवर्धन, नवीन वन निर्मिती आणि कापणीच्या पध्दती, निम्न वन प्रणाली. |
| 05 | **जैव विविधता व्यवस्थापन** | श्री. एस.बी. धर्माधिकारी, सहा. वनसंरक्षक (से.नि.) | **उद्देश:** पृथ्वीवरील विविध जीवसृष्टीचे संरक्षण व संतुलन राखणे.<br>**मुख्य घटक:** जैवविविधतेची संकल्पना आणि स्तर, आनुवंशिक, प्रजातीगत, परिसंस्थात्मक.<br>**जैवविविधतेचे महत्त्व:** पर्यावरणीय, आर्थिक, औषधी, सांस्कृतिक. स्थानिक व लुप्तप्राय प्रजातींचे संवर्धन.<br>**संरक्षित क्षेत्रे** - राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये, राखीव क्षेत्रे. |
| 06 | **जल व मृद संधारण** | श्री. अनिल लोखंडे, खाजगी अभियंता, रा.परतवाडा. | **उद्देश:** पाणी आणि मातीचे संवर्धन करून वन व कृषी उत्पादन टिकवून ठेवणे.<br>**व्याख्या** : उपलब्ध जलसंपत्तीचे संरक्षण, संवर्धन व विकास आणि तिचे उपयुक्ततापूर्ण व फायदेशीर व्यवस्थापन करणे. |
| 07 | **कुरण विकास व्यवस्थापन** | प्रा. जी. डी. मुरतकर, सिपना कॉलेज, चिखलदरा. | **उद्देश** : पशुधन व वन्यजीवांसाठी शाश्वत चारापूरवठा उपलब्ध करणे. कुरणांची माती, पाणी व जैवविविधता सुधारणा करणे.<br>**मुख्य घटक**: कुरणांचे सर्वेक्षण, मृद व हवामान मूल्यांकन गवत लागवड, सुधारणा व व्यवस्थापन चाराप्रकार, वन्यजीवांसाठी चराईक्षेत्र विकास. |
| 08 | **वन्यजीव व्यवस्थापन** | श्री. एस.एम. सुरजुसे, सहा. वनसंरक्षक (से.नि.) | **उद्देश** : वन्यजीवांचे संरक्षण, संवर्धन व त्यांचा नैसर्गिक अधिवास टिकवणे. जैवविविधता संतुलित ठेवणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | **मुख्य घटक**: अधिवास संरक्षण, परिसंस्था संवर्धनवन्यजीव गणना, निरीक्षण व संशोधनमानव-वन्यजीव संघर्ष नियंत्रणसंरक्षित क्षेत्रांचे नियोजन. |
| 09 | **वनमिती** | श्री. एस.एन.गुल्हाने, सहा. वनसंरक्षक (से.नि.) | **उद्देश** : जंगलातील लाकूडसंपत्तीचे अचूक मूल्यांकन करणे. कार्ययोजना व वनसंपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक माहिती उपलब्ध करणे.<br>**मुख्य घटक**: वृक्ष मापन पद्धती (उंची, व्यास, घनफळ) वनक्षेत्र सर्वेक्षण तंत्रनमुना सर्वेक्षण व डेटा विश्लेषण. |
| 10 | **पुनरुत्पादन पध्दती ( वनसंवर्धन शास्त्र भाग-3)** | कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | **उद्देश**: जंगलांचा सातत्यपूर्ण वाढीचा वेग टिकवून ठेवणे. हरितक्षेत्र वाढवणे व लाकूडसंपत्तीची स्थिर उपलब्धता सुनिश्चित करणे.<br>**मुख्य घटक**: प्राकृतिक पुनरुत्पादन (बी उगवण, अंकुरोत्पादन) कृत्रिम पुनरुत्पादन (लागवड, बियाणे पेरणी, रोपवाटिका) कापणी पद्धती, पुनरुत्पादन निरीक्षण, वनांची पुनरुत्पती, नैसर्गिक पुनरुत्पत्ती, मियावाकी वृक्षारोपन पध्दती. |
| 11 | **वनकायदे** | श्री. एस.एम. जगताप, वि.व.अ. (से.नि.) | **उद्देश:** वनसंरक्षण, वनव्यवस्थापन व वनातील गुन्ह्यांचे नियंत्रण यासाठी कायदे समजणे.<br>**मुख्य घटक:** भारतीय वन अधिनियम, 1927 (Indian Forest Act).<br>वन्यजीव संरक्षण अधिनियम, 1972 (Wildlife Protection Act).<br>वनसंवर्धन अधिनियम, 1980 (Forest Conservation Act).<br>अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत वनवासी (अधिकार मान्यता) अधिनियम, 2006 (FRA).<br>वनगुन्हे ओळखणे, पंचनामा, जप्ती, न्यायालयीन कार्यवाहीची मूलभूत माहिती. |
| 12 | **वन अभियांत्रिकी** | श्री. एस.एम. सुरजुसे, सहा. वनसंरक्षक (से.नि.) | **उद्देश** : वनसंपत्तीच्या योग्य व्यवस्थापनासाठी अभियांत्रिकी तत्वांचा वापर करणे. वनउत्पादनांची सुरक्षित, कार्यक्षम व शाश्वत वाहतूक सुनिश्चित करणे.<br>**मुख्य घटक** : वन रस्ते, पूल, जलसंधारण रचना उभारणी, मृद व जलसंरक्षण अभियांत्रिकी, लाकूड उत्खनन व वाहतूक तंत्र,यांत्रिक साधनांचा वापर व देखभाल |
| 13 | **मृदशास्त्र** | कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | **उद्देश** : खडक व माती, पृथ्वीचे आवरण, अग्निजन्य, जलयजन्य व रुपांतरित खडक व त्यांचे विविध प्रकार, खडक व खनिजांचे विघटन.<br>**मुख्य घटक**: मातीची उत्पत्ती, रचना, गुणधर्ममृद प्रकार, सुपीकता, पोषकतत्त्वेमृद अपरदन व जलसंरक्षण तत्त्वे, भौतिक व रासायनिक जैविक कारके व प्रक्रिया, जमिनीचा पोत व जमिनीची घडण, आम्ल-विम्ल निर्देशांक, महत्वाचे मातीचे प्रकार व गुणधर्म. |
| 14 | **भुमि अभिलेख** | श्री. हेमंत शेवाळे, संचालक, वन प्रशिक्षण संस्था, पाल. | **उद्देश** : वनक्षेत्राची स्पष्ट, संगणकीकृत व अचूक नोंद राखणे. सीमावाद टाळणे व जमीन व्यवस्थापन सुलभ करणे.<br>**मुख्य घटक**: नकाशे, भू-मापन, सातबारा व इतर अभिलेखभू-सीमा निर्धारण, दुरुस्ती व डिजिटल नोंद GIS, GPS वापर. |
| 15 | **वनसर्व्हेक्षण** | श्री. एस. व्ही. कुंभकर्ण सर. | **उद्देश**: 1. वनक्षेत्राचे मोजमाप करणे. 2. वनसंपत्तीचे मुल्यांकन. 3. वन व्यवस्थापनासाठी माहिती मिळवणे. 4. वनसंरक्षण व संवर्धन. 5. वनविकास व नियोजन. 6. शासकीय नोंदी व कायदेशीर उपयोग.<br>**मुख्य घटक** : 1. क्षेत्र सर्व्हेक्षण. 2. नकाशा तयार करणे. 3. नमुना पध्दत. 4. वृक्ष मोजमाप. 5. रिमोट सेन्सिंग व GIS. 6. डेटा संकलन व विश्लेषण. 7. वन प्रकार वर्गीकरण. |

# वनरक्षक सत्र क्र. 64 प्रथम सत्र अभ्यासक्रम.









02. वनरक्षक सत्र क्र. 64 मधील प्रशिक्षणार्थींचे प्रथम सत्र अभ्यासक्रमादरम्यान संस्थेतील परीसरामध्ये क्षेत्रीय अभ्यास दौरा. ( माहे जुलै 2026 )

( विषय: वनअभियांत्रीकी, व्याख्याते श्री. एस.एम. सुरजुसे, सहा. वनसंरक्षक (से.नि.)







( विषय: वनसर्व्हेक्षण,  व्याख्याते श्री. एस. व्ही. कुंभकर्ण सर )







## 03. **वनरक्षक प्रशिक्षणार्थी यांना GPS व GIS या विषयावर प्रशिक्षण**.



वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथील नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी तुकडी क्र. 64 चे सर्व प्रशिक्षणार्थी यांना श्री. एस. व्हि. कुंभकर्ण,(से.नि. सहा.वनसंरक्षक ) यांनी **GPS व GIS** या विषयावर प्रशिक्षण दिले.

वनरक्षक प्रशिक्षणार्थी यांना दिलेल्या **जी.पी.एस.** (Global Positioning System) **आणि जी.आ.एस.** (Geographical Information System) विषयावरील प्रशिक्षणामुळे त्यांच्या तांत्रिक ज्ञानात आणि क्षेत्रीय कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ झाली आहे. या प्रशिक्षणातून पशिक्षणार्थींना जंगल क्षेत्राचे अचूक सर्वेक्षण, नकाशे तयार करणे, सिमारेषा ओळखणे, वनक्षेत्रातील बदलांचा मागोवा घेणे तसेच संसाधन व्यवस्थापनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्याची कौशल्ये प्राप्त झाली. यामुळे वनसंवर्धन, वनसंपत्तीचे शाश्वत व्यवस्थापन आणि गुन्हे प्रतिबंध या सर्वच कार्यांमध्ये अचूकता, पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढली आहे. या प्रशिक्षणाचा परिणाम म्हणून वनरक्षक अधिक तांत्रिकदृष्ट्या सक्षम, जबाबदार आणि आधुनिक पध्दतीने कार्य करणारे झाले आहेत, ज्याचा थेट फायदा वन विभागाच्या उद्दिष्टपूर्तीस आणि पर्यावरण संवर्धनास होणार आहे.

## 04. वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 64 प्रथम सत्र लेखी परीक्षा.
## ( दि. 27/07/2026 ते 05/08/2026 )



वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे दिनांक 27/07/2026 ते 05/08/2026 या कालावधीमध्ये अप्रशिक्षित वनरक्षक सत्र क्र. 64 मधील सर्व प्रशिक्षणार्थ्यांची प्रथम सत्राची लेखी परीक्षेचे आयोजन करण्यात आले. एकूण 53 प्रशिक्षणार्थी या परीक्षेमध्ये सहभागी झाले. ही परीक्षा **संचालक,** कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे व नियोजनबध्द पध्दतीने पार पडली.

परीक्षेचे वेळापत्रक पूर्वनियोजित पध्दतीने तयार करण्यात आले. परीक्षेच्या संपूर्ण प्रक्रियेमध्ये शिस्त, पारदर्शकता आणि नियमानुसार कार्यवाही करण्यात आली. परीक्षा केंद्रावर आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या.

सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी, पर्यवेक्षक यांनी आपापली जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडली. परीक्षेच्या दरम्यान कोणताही अनुचित प्रकार आढळून आला नाही. प्रशिक्षणार्थ्यांनीही अत्यंत सकारात्मक व शिस्तबध्द सहभाग नोंदवून परीक्षेला सहकार्य केले.

**प्रथम सत्र परीक्षा वेळापत्रक**

| अ.क्र | वार | दिनांक | वेळ | विषय | गुण |
|---|---|---|---|---|---|
| 01 | शुक्रवार | दि. 10/07/2026 | 10.00 ते 12.00 | 1. वनसर्व्हेक्ष प्रात्यक्षिक 25 गुण. | 25 |
| 02 | सोमवार | दि. 27/07/2026 | 10.00 ते 12.00 | 1. वनस्पतीशास्त्र (गुण-40) लेखी.<br>2. वनस्पतीशास्त्र (गुण-10) प्रात्यक्षिक. | 50 |
| 03 | मंगळवार | दि. 28/07/2026 | 10.00 ते 12.00 | 1. मृदशास्त्र (10 गुण) 2. मृद व जलसंधारण (40 गुण) | 50 |
| 04 | बुधवार | दि. 29/07/2026 | **अवकाश / सुट्टी** | | |
| 05 | गुरुवार | दि. 30/07/2026 | 10.00 ते 13.00 | 1. वन आणि वन्यजीव विषयक कायदे. (100 गुण लेखी) | 100 |
| 06 | शुक्रवार | दि. 31/07/2026 | 10.00 ते 12.00 | 1. पुनरुत्पादन पध्दती (50 गुण) | 50 |
| 07 | शनिवार | दि. 01/08/2026 | 10.00 ते 12.00 | 1. वनअभियांत्रीकी (20 गुण) 2. वनमिती (10 गुण)<br>3. भुमी अभिलेख (15 गुण) | 45 |
| 08 | रविवार | दि. 02/08/2026 | **शासकिय सुट्टी** | | |
| 09 | सोमवार | दि. 03/08/2026 | 10.00 ते 13.00 | 1. वन्यजीव व्यवस्थापन (गुण-70) 2. कुरण व्यवस्थापन (गुण-15) 3. जैवविविधता व्यवस्थापन (गुण-15) | 100 |
| 10 | मंगळवार | दि. 04/08/2026 | 10.00 ते 12.00 | 1. वनसंवर्धनशास्त्र भाग-1 (गुण-20)<br>2. वृक्षसंवर्धन आणि त्यांचे समुपयोजन (गुण-30) | 50 |
| 11 | बुधवार | दि. 05/08/2026 | 10.00 ते 12.00 | 1. वनसर्व्हेक्ष लेखी 30 गुण. | 30 |

## 05. वनरक्षक सत्र क्र. 64 मधील प्रशिक्षणार्थींचे कवायत व खेळ. ( माहे जुलै 2026 )





नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी यांना सहा महिन्यांच्या प्रशिक्षण कालावधीत दररोज नियमितपणे शारीरिक कवायत, व्यायाम व विविध मैदानी खेळांचे प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षणाचा एक भाग म्हणून प्रशिक्षणार्थींकडून ५ किलोमीटर धावणे (रनिंग) करून घेतले जाते. तसेच शारीरिक क्षमता, सहनशक्ती, शिस्त, संघभावना आणि कार्यकुशलता विकसित करण्याच्या उद्देशाने विविध प्रकारचे मैदानी खेळ व शारीरिक प्रशिक्षणाचे उपक्रम आयोजित केले जातात. या प्रशिक्षणामुळे प्रशिक्षणार्थी शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम होऊन वनरक्षक पदाची जबाबदारी प्रभावीपणे पार पाडण्यास तयार होतात.

सदर प्रशिक्षणार्थींना एस.एस. आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा व महादेव धुर्वे, कंत्राटी सहा. कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांनी योग्य ते मार्गदर्शन केले.

# प्रशिक्षणार्थींचे कवायत व खेळ. ( माहे जुलै 2026 )







## 06. **वन महोत्सव कार्यक्रम** ( **दि.** 01 **जुलै ते** 07 **जुलै** 2026 )






वन प्रशिक्षण संस्था चिखलदरा येथे सुरु असलेले नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक सत्र क्र. 64 मधील सर्व प्रशिक्षणार्थी यांनी दि. 01 जुलै 2026 ते 07 जुलै 2026 या कालावधीत वन महोत्सव कार्यक्रम उत्साहपूर्ण व नियोजनबध्द पध्दतीने साजरा केला. वन महोत्सव कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला असून, त्यातून पर्यावरण संरक्षण व वनसंवर्धनाचा सकारात्मक संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यात आला.

## 07. **वसंतराव नाईक यांची जयंती**. ( दि. 01/07/2026 )




वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे दि. 01/07/2026 रोजी **वसंतराव नाईक** यांची जयंती **संचालक,** कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते आदरपुर्वक व अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली.

माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्त्वाचे, लोकाभिमुख धोरणांचे आणि ग्रामीण विकासासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करण्यात येते. कृषी, जलसंधारण, शिक्षण, रोजगार निर्मिती आणि सर्वसमावेशक विकास या क्षेत्रांतील त्यांच्या योगदानामुळे महाराष्ट्राच्या प्रगतीला नवी दिशा मिळाली. त्यांचे कार्य आजही समाजासाठी प्रेरणादायी असून सार्वजनिक सेवेत प्रमाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि जनकल्याणाची भावना जोपासण्याची प्रेरणा देते. त्यांच्या विचारांचा व कार्याचा आदर्श स्वीकारून विकासाभिमुख, लोककेंद्रित व जबाबदार प्रशासनाच्या उभारणीसाठी प्रत्येकाने सक्रिय सहभाग नोंदविणे, हीच त्यांच्या जयंतीनिमित्त खरी आदरांजली ठरेल.

## 08. **श्री संत गुलाबराव महाराज यांची जयंती**. ( **दि. 06/07/2026** )




वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे दि. 06/07/2026 रोजी **श्री संत गुलाबराव महाराज** यांची जयंती **संचालक**, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते आदरपुर्वक व अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली.

संत गुलाबराव महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या अद्वितीय ज्ञानपरंपरेचे, अध्यात्मनिष्ठ जीवनकार्याचे आणि समाजप्रबोधनासाठी दिलेल्या अमूल्य योगदानाचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करण्यात येते. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून त्यांनी भक्ती, ज्ञान, विवेक आणि मानवतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविला. त्यांच्या विचारांमधून समता, सदाचार, नैतिक मूल्ये आणि ईश्वरभक्तीची प्रेरणा मिळते. त्यांच्या शिकवणीचा आदर्श स्वीकारून समाजहित, चारित्र्यसंपन्न जीवन आणि लोककल्याणासाठी कार्य करण्याचा संकल्प करणे, हीच त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना वाहिलेली खरी आदरांजली ठरेल.

09. वनरक्षक प्रशिक्षणार्थी यांची रात्रगस्त ( माहे जुलै-2026 )








10. **वृत्तपत्र कात्रणे**.

# वसंतराव नाईक जयंतीनिमित्त चिखलदऱ्यात वनरक्षक प्रशिक्षणार्थ्यांची स्वच्छता मोहीम

## स्कायवॉक व ठाकूर पॉईंट परिसर प्लास्टिकमुक्त करण्याचा संकल्प



चिखलदरा दि. १ : हरित महाराष्ट्राचे शिल्पकार तथा माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथील अप्रशिक्षित वनरक्षक तुकडी क्रमांक ६४ च्या वतीने स्कायवॉक व ठाकूर पॉईंट परिसरात भव्य प्लास्टिक निर्मूलन व स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला प्रशिक्षणार्थी वनरक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

वन प्रशिक्षण संस्थेच्या संचालक मुक्ताबाई टेकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच कवायत शिक्षक सुधीर आकेवार यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम पार पडली. पर्यटनस्थळांवर पर्यटकांनी टाकलेल्या प्लास्टिकच्या बाटल्या, पिशव्या आणि इतर प्लास्टिक कचरा गोळा करून संपूर्ण परिसर स्वच्छ करण्यात आला. यावेळी उपस्थित पर्यटक आणि स्थानिक नागरिकांना प्लास्टिकचा वापर टाळण्याचे तसेच पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना संचालक मुक्ताबाई टेकाळे यांनी सांगितले की, वनरक्षक हा केवळ गणवेशधारी कर्मचारी नसून निसर्गसंवर्धनाचा खरा प्रहरी आहे. स्व. वसंतराव नाईक यांनी हरित महाराष्ट्राचे स्वप्न पाहिले होते. प्लास्टिकमुक्त परिसर निर्माण करणे ही त्या स्वप्नाला खरी आदरांजली आहे.

कवायत शिक्षक सुधीर आकेवार यांनी संपूर्ण मोहिमेचे शिस्तबद्ध नियोजन केले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महादेव धुर्वे आणि नितीन बघाये यांनी विशेष सहकार्य केले. पर्यावरण संरक्षणाची सामाजिक जबाबदारी जोपासत वनरक्षक प्रशिक्षणार्थ्यांनी दिलेला हा संदेश नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरला.